# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान/ 510 /2024-25

दिनांक :- 14/10/2024

**// जाहीर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) केशवसृष्टी रोड, उत्तन, येथिल श्रीम. एस. जे. परेरा | 01 नग गुलमोहर<br>0 नग काटेरी चिंच | सदरची झाडे घराच्या आवारात उंच वाढलेली असून झाडे धोकादायकरित्या कंपाऊड वॉलवरुन मुख्य रस्त्यावर झुकलेली आहेत. जोराच्या वा-या पावसाने झाड पडून जिवित व वित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरची झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| 2 | भाईदर (पू.) रो हॉऊस क्र.1, ग्रिनफ़िल्ड सोसायटी येथिल श्री. मोहन बी. नायर | 04 नग नारळ | सदरची झाडे श्री. मोहन बी. नायर यांच्या घराच्या आवारात उंच वाढलेली असून मुख्य रस्त्यावर झुकलेली आहेत. जोराच्या वा-या पावसाने झाडे पडून जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरची झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| 3 | भाईंदर (प.) येथील भाईंदर पोलिस ठाण्याच्या इमारतीच्या मागील बाजुस | 02 नग नारळ | सदरची झाडे भाईंदर पोलिस ठाण्याच्या इमारतीच्या मागील बाजुस असलेल्या आवारात झुकलेली असुन सदर झाडाखाली पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची ये-जा असते तसेच कार व दुचाकी वाहने पार्क केलेली असतात जोराच्या वा-या पावसाने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरची धोकादायक झाडे मुळासकट काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)<br>
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner